# परिपत्रक

विषयः विदेशातुन आयात होणा-या मद्यांची
नोंदणी व लेबल मंजूरी बाबत.

--------

क्रमांकः एफएलआर/११२००१/१३९४४/५(ब) मुंबई २१ सप्टेंबर २००१

शासन अधिसूचना गृह विभाग क्रमांक एमएलएस/११००/सीआर-२८/इएक्ससी-३ दिनांक ३१ ऑगस्ट २००१ अन्वये परदेशातुन आयात होणा-या विदेशी मद्याच्या नोंदणी बाबत ( registration of brands) तसेच लेबल मंजूरी बाबत ( approval of labels) शुल्क विहित करण्यात आले आहे. आयात केलेल्या विदेशी मद्याच्या विक्री बाबत पुढील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

(१) मुंबई विदेशी मद्य नियमावली १९५३ अंतर्गत एफएल-१ अनुज्ञप्तीधारकच विदेशी मद्यांच्या ब्रँडची नोंदणी करण्यास सक्षम आहेत.

(२) एफएल-१ अनुज्ञप्तीधारक प्रथम साध्या कागदावर किंवा लेटरहेडवर पुढीलप्रमाणे माहिती सादर करतील.

(अ) एफएल-१ अनुज्ञप्तीधारकाचे नाव आणि ठिकाण.
(पहिल्या नोंदणीच्या वेळी व दर वर्षी एप्रिल मध्ये
एफएल-१ची प्रत जोडावी)

(ब) ज्या विदेशी मद्याच्या ब्रॅन्डची नोंदणी करावयाची
आहे त्या ब्रॅन्डची नांवे

(क) मद्य उत्पादकाचे व मद्य उत्पादन झालेल्या देशाचे नाव

(३) मद्याचे प्रकार ब्रॅडचे नांव मद्याची तिव्रता

(अ) स्पिरीट

(ब) वाईन

(क) बीयर